## जनसंपर्क विभाग

जळगाव. दि.29 (        ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या हिंदी विभागाचे प्रमुख डॉ.सुनील कुलकर्णी यांची महाराष्ट्र राज्य हिंदी साहित्य अकादमीच्या सदस्यपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

हिंदी साहित्याच्या उन्नतीसाठी व उत्तेजनासाठी राज्यात हिंदी साहित्य अकादमी स्थापन करण्यात आली आहे. सांस्कृतिक कार्यमंत्री हे या साहित्य अकादमीचे अध्यक्ष आहेत. विद्यापीठाच्या हिंदी विभागाचे प्रमुख डॉ.सुनील कुलकर्णी यांची सदस्य म्हणून या अकादमीवर नियुक्ती झाली आहे. डॉ.कुलकर्णी हे 2006 पासून विद्यापीठाच्या भाषा अभ्यास प्रशाळा व संशोधन केंद्रात हिंदी विभागात कार्यरत आहेत. देशगव्हाण ता.अंबड, जि.जालना हे त्यांचे मुळगाव असून महाराष्ट्र राज्य पाठयपुस्तक निर्मिती मंडळ बालभारती पुणेच्या हिंदी विषय समिती सदस्य म्हणून देखील ते कार्यरत आहेत. विद्यापीठाच्या हिंदी अभ्यास मंडळाचे ते अध्यक्ष असून डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या हिंदी अभ्यास मंडळाच्या सदस्यपदी त्यांची नुकतीच नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्या या नियुक्तीचे कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील, प्र-कुलगुरु प्रा.पी.पी.माहुलीकर, व्यवस्थापन परिषद सदस्य दिलीप पाटील, कुलसचिव भ.भा.पाटील, प्रा.मनिष जोशी आदींनी अभिनंदन केले.

---

जा.क्र . : उमवि/16/हस्तदेय /2018 दिनांक : 29 ऑक्टोबर,2018

प्रति,
**मा. संपादक / प्रतिनिधी,**

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या दैनिकातून प्रसिध्द करण्यात यावी, ही विनंती.

आपला विश्वासू,

स्वाक्षरीत प्रत/-
(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी